# भाग अ

# प्रकरण I

# प्रस्तावना

## भाग अ

## प्रकरण I: प्रस्तावना

### 1.1 प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना

खाण आणि खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, 1957 च्या सुधारणेद्वारे मार्च 2015 मध्ये समाविष्ट केलेल्या कलम 9(ब) अनुसार खनिज बाधित प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा खनिज प्रतिष्ठान ट्रस्ट (डीएमएफटी) स्थापन करणे आवश्यक होते. सप्टेंबर 2015 मध्ये अधिसूचित, खाण आणि खनिजे (जिल्हा खनिज प्रतिष्ठानला योगदान) नियम, 2015 च्या नियम 2 नुसार, प्रत्येक खनिज भाडेपट्टेधारकाला रॉयल्टी व्यतिरिक्त, ज्या जिल्ह्यात खनिकर्म केले जाते त्या जिल्ह्यातील जिल्हा खनिज प्रतिष्ठानला (डीएमएफ) केंद्र शासनाने विहित केलेली रक्कम द्यावी लागते.

भारत सरकारने सप्टेंबर 2015 मध्ये डीएमएफद्वारे निर्माण होणाऱ्या निधीचा वापर करून खनिज बाधित होणाऱ्या क्षेत्रांचे आणि व्यक्तींचे कल्याण सुनिश्चित करण्यासाठी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (पीएमकेकेकेवाय) सुरू केली. या योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांचा उद्देश खनिज बाधित क्षेत्रांचे व व्यक्तींचे कल्याण सुनिश्चित करणे एवं राज्यभरात डीएमएफटी निधीच्या समन्वय आणि वापर सुलभ करण्यासाठी खालील उद्दिष्टांसह होता:

(a) खनिज बाधित क्षेत्राचा विकास व कल्याण करण्यासाठी विविध प्रकल्प कार्यक्रम राबविणे, व सदर कार्यक्रम/प्रकल्प केंद्र/राज्य आणि शासनाच्या अस्तीवातील चालू कार्यक्रम व योजनांना सहाय्यभूत पूरक रहातील;


(b) खनिज जिल्ह्यात खनिकर्म करताना व त्यानंतर झालेल्या कृतीमूळे तेथील जनतेवर झालेले पर्यावरण, आरोग्य व सामाजिक व आर्थिक परिस्थितीवरील आघात/परिणाम कमी करणे व त्यावर उपाययोजना करणे; आणि

(c) खाण बाधित क्षेत्रातील व्यक्तींना दिर्घ मूदतीचे शाश्र्वत उपजिविकेचे साधण उपलब्ध करून देणे.

### 1.2 संघटनात्मक रचना

खनिकर्म विभागाची संघटनात्मक रचना खालील **आलेख 1** मध्ये दिली आहे:

**आलेख 1: खनिकर्म विभागाची संघटनात्मक रचना**




***(स्त्रोत: खनिकर्म विभागाद्वारे दिलेली माहिती)***

महाराष्ट्र शासनाचा (महाराष्ट्र शासन) खनिकर्म विभाग खनिज क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी आणि खनिजांपासून राज्याच्या तिजोरीत महसूल संचयन करण्यासाठी नियामक आणि प्रोत्साहनात्मक कार्ये करतो.

भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय (डीजीएम) ला खनिज शोध आणि खनिज प्रशासनाचे काम सोपवण्यात आले आहे. डीजीएमची नागपूर, चंद्रपूर, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर येथे चार प्रादेशिक कार्यालये आहेत.

बृहन्मुंबई वगळता महाराष्ट्रातील 35 जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये खनिज प्रशासनाच्या कामात जिल्हाधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी जिल्हा खनिकर्म अधिकारी (डीएमओ) तैनात आहेत.

## 1.3 लेखापरीक्षण उद्दिष्टे

लेखापरीक्षण हे मूल्यमापन करण्यासाठी करण्यात आले की तेथे:

1. योजना मार्गदर्शक तत्त्वे आणि महाराष्ट्र डीएमएफटी नियम, 2016 नुसार पीएमकेकेकेवायच्या अंमलबजावणीसाठी प्रभावी नियोजन आणि संस्थाविषयक व्यवस्था होती की नाही;
2. डीएमएफटी निधीचे संचयन आणि व्यवस्थापन करण्याची विश्वसनीय आणि कार्यक्षम प्रणाली होती की नाही;
3. पीएमकेकेकेवाय मार्गदर्शक तत्वांनुसार योजनांची प्रभावी अंमलबजावणी; आणि

4. योजनेच्या अंमलबजावणीचे प्रभावी संनियंत्रण आणि मूल्यमापन होते की नाही.

## 1.4 लेखापरीक्षण निकष

लेखापरीक्षण निकष खालील स्रोतांकडून घेतले गेले आहेत:

- पीएमकेकेकेवाय मार्गदर्शक तत्वे, 2015;
- खाणी आणि खनिजे (विकास आणि नियमन) अधिनियम, 1957 आणि त्यानंतरची सुधारणा;
- महाराष्ट्र जिल्हा खनिज प्रतिष्ठान (ट्रस्ट) नियम, 2016 आणि त्यानंतरची सुधारणा;
- खनिज सवलत नियम, 1960 आणि त्यानंतरच्या सुधारणा;
- पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, 1986;
- भूमीसंपादन व पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013;
- महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकसन व विनियमन) अधिनियम, 2013;
- खनिज संवर्धन आणि विकास नियम, 1988 आणि सुधारणा, 2017;
- महाराष्ट्र खनिज (अवैध उत्खनन, वाहतूक आणि साठवणूक प्रतिबंध) नियम, 2001;
- खनिज (लिलाव) नियम, 2015;
- राष्ट्रीय खनिज धोरण, 2019;
- भारत सरकारने सुधारित केलेल्या रॉयल्टीच्या दरांवरील परिपत्रके आणि भारतीय खनिकर्म ब्युरोने प्रकाशित केलेल्या मासिक किंमत अधिसूचना;
- अंतर्गत नियंत्रण प्रणाली संदर्भात राज्य शासनाने स्थापित केलेले निकष आणि मानके आणि प्राधिकरणाद्वारे स्थापित केलेली इतर मानके; आणि
- सामान्य वित्तीय नियम, महाराष्ट्र कोषागार संहिता, वित्तीय शक्ति प्रदान नियम, सार्वजनिक खरेदी मार्गदर्शक तत्वे, वित्त विभाग मार्गदर्शक तत्वे, राज्य आणि केंद्र शासनाचे इतर कोणतेही परिपत्रक, अधिसूचना आणि मार्गदर्शक तत्वे यांच्या तरतुदी.

## 1.5 लेखापरीक्षण व्याप्ती आणि पद्धती

1 सप्टेंबर 2016 पासून 31 मार्च 2023 पर्यंतच्या कालावधीचे कामगिरी लेखापरीक्षण (पीए) जुलै 2023 ते जून 2024 या दरम्यान करण्यात आले.

खनिकर्म विभागाचे सहसचिव आणि निवडक पाच डीएमएफटींच्या[1] जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांसोबत (सप्टेंबर 2023) प्रवेश बैठक आयोजित करण्यात आली होती, जिथे लेखापरीक्षण पद्धती, व्याप्ती, लेखापरीक्षण उद्दिष्टे आणि त्यांचे निकष यावर चर्चा करण्यात आली.

लेखापरीक्षण प्रक्रियेत उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभाग आणि पाच निवडक डीएमएफटी येथील अभिलेख्यांची तपासणी करण्यात आली. पीएमकेकेकेवायच्या निवडक प्रकल्पांची संयुक्त प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली. संबंधित युनिट्सना लेखापरीक्षण निरीक्षणे जारी केले व जिथे जिथे उत्तरे मिळाली तिथे ती योग्यरित्या समाविष्ट करण्यात आली आहेत. अतिरिक्त मुख्य सचिव (खनिकर्म), महाराष्ट्र शासन, डीजीएम आणि संबंधित डीएमएफटींना मसुदा अहवाल जारी केला (30 जुलै 2024).

खनिकर्म विभागाचे सहसचिव आणि निवडक पाच डीएमएफटींच्या जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांसोबत निर्गमन बैठक (ऑगस्ट 2024) आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये लेखापरीक्षण निष्कर्षांवर चर्चा करण्यात आली.

महाराष्ट्र शासनाकडून मिळालेल्या उत्तरांचा (डिसेंबर 2024, फेब्रुवारी 2025 आणि मे 2025) अहवालात योग्यरित्या समावेश करण्यात आला आहे.

## 1.6 लेखापरीक्षण नमुना

प्रतिनिधीक नमुना मिळविण्यासाठी, **तक्ता 1** मधील तपशीलानुसार मंजूर नमूना पद्धतीनुसार जिल्हे, ब्लॉक्स, ग्रामपंचायती, प्रकल्प आणि लाभार्थींची निवड करण्यात आली:

[1] भंडारा, चंद्रपूर, नागपूर, रायगड आणि यवतमाळ.

**तक्ता 1: नमुना निवडीचा तपशील**

| तपशील | कार्यपद्धती | निवड |
|---|---|---|
| जिल्हे | भारित सरासरी गुणांचा विचार करून स्तरीकृत नमुन्याद्वारे जिल्हे निवडण्यात आले. | 5 |
| ब्लॉक्स | प्रत्येक जिल्ह्यातून तीन ब्लॉक्स निवडण्यात आले, त्यापैकी सर्वाधिक प्रकल्प असलेले दोन ब्लॉक्स आणि यादृच्छिक नमुन्याद्वारे एक ब्लॉक्स निवडण्यात आला. | 15 |
| ग्रामपंचायती | प्रत्येक निवडक ब्लॉकमधून, यादृच्छिक नमुन्याद्वारे[2] तीन ग्रामपंचायती निवडण्यात आल्या. | 42 |
| प्रकल्प/कामे | किमान तीन प्रकल्प किंवा पूर्ण झालेल्या प्रकल्पांची संख्या तीनपेक्षा कमी असल्यास, प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये सर्व प्रकल्पांची निवड निर्णयात्मक नमुन्याद्वारे करण्यात आली. | 110 |
| लाभार्थी | प्रत्येक ग्रामपंचायतीतील 15 लाभार्थींची निवड यादृच्छिक नमुन्याद्वारे[3] करण्यात आली. | 675 |

निवडक जिल्हे, ब्लॉक्स, ग्रामपंचायतींची यादी **परिशिष्ट 1** मध्ये दिली आहे.

## 1.7 अभिस्वीकृति

कामगिरी लेखापरीक्षण आयोजित करण्याच्या विविध टप्प्यांवर उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभाग, महाराष्ट्र शासन, डीजीएम तसेच संबंधित डीएमएफटी यांनी प्रदान केलेल्या सहकार्याची लेखापरीक्षण अभिस्वीकृति देते.

[2] नागपूर शहर ब्लॉकमध्ये ग्रामपंचायत नाही.

[3] नागपूर शहरातून 45 लाभार्थी निवडण्यात आले.